## आपल्या अन्नात विषाची भेसळ ?
## होय हे विदारक सत्य आहे.

शासनानेच प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार क्लोरडेन, हेप्टाक्लोर आणि डी.डी.टी. सारखी बंदी असलेली कीटकनाशके आपल्या रोजच्या जेवणात प्रविष्ट झालेली आढळून येत आहेत.
क्लोरडेन हे कीटकनाशक आपल्या मेंदू, मज्जासंस्था किडनी, लिव्हर व डोळे यांनाही अपायकारक आहे. शिवाय कांही विशिष्ट अन्नधान्यांत वापरण्याचे कारण नसतानाही ही कीटकनाशके सामाविष्ट होत आहेत.
कायद्याप्रमाणे मोनोक्रोटोफॉस आपल्या देशात सर्वाधिक वापरात असलेले आरोग्यावर तात्काळ अथवा दीर्घकालीन दुष्परिणाम करणारे कीटकनाशक भाज्यांवर वापरण्यास बंदी आहे. परंतु वेगवेगळ्या एजन्सीतर्फे अनेक चाचण्या घेतल्या गेल्या तेव्हा पुन्हापुन्हा हे भाज्यांमध्ये समाविष्ट असल्याचे उघडकीस आले आहे.
सर्वच कीटकनाशके व विषारी पदार्थ जे शेतात वापरले जातात त्यांचे प्रमाण आपल्या अन्नात कायद्याला मान्य असलेल्या मर्यादेच्या कितीतरी जास्त पटीने आढळून येतात.
जरा विचार करा. तुम्ही ताजी फळे व भाज्यांची निवड करण्यात किती पैसे, वेळ व शक्ती खर्च करता? पण हे सर्व घरी आणून, निवडून, धुवून, शिजवूनही तुम्ही त्यातील विषारी गुणधर्म असलेली कीटकनाशके हटवू शकत नाही आणी तुमच्या कुटुंबातील माणसांना व स्वतःला या रसायनिक पदार्थांच्या घातक परिणामांपासून वाचवू शकत नाही.
हळूहळू ही विषारी द्रव्ये तुमच्या शरीरातील महत्वाचे अवयव निकामी करू शकतात. उदा. मेंदू, किडनी, लिव्हर.
फळे, भाज्या, दूध, अंडी, मटण या सर्व पदार्थांमध्ये कीटकनाशकांचा अंश मोठ्या प्रमाणात आढळून येतो. भारतातील कायद्याला मान्य असलेल्या प्रमाणापेक्षा (MRL = Maximum Residue Limits) कितीतरी अधिक पटीने.
एवढेच नाही तर आपल्या पिण्याच्या पाण्यातही कीटकनाशकांचे प्रमाण आढळते आणि कहर म्हणजे अगदी आईचे दूधही यापासून वाचलेले नाही.
आपल्या देशावर (वनस्पती, पशुपक्षी व मानवावर) घडत असलेल्या या विषप्रयोगाकडे कोणाचेही लक्ष नाही व हे टाळण्यासाठी कोणतीही उपाययोजना आखण्यात आलेली नाही.

## सरकारचे लक्ष कुठे आहे ?

हे स्पष्ट आहे की या प्रश्नाचे मूळ आपल्या शेतात आहे. भारतीय शासनयंत्रणा या घातक कीटकनाशकांच्याउपयोगाला मान्यता देऊन त्यांची पाठराखण करत आहे. जरी त्यांचे दुष्परिणाम सर्वज्ञात आहेत व दुसरे सुरक्षित पर्याय उपलब्ध आहेत तरी सुद्धा !
यामुळे केवळ कीटकनाशक निर्माण करणाऱ्या कंपन्यांची भरभराट होत आहे, सामान्य माणसाच्या आयुष्याशी खेळून !

India for Safe Food
Safe Food - Our Right! No Chemicals, No GM!

याच्यावरताण म्हणजे आता शासनाने GM Crops अर्थात (genetically modified crops) अर्थात् जनुकबदल केलेली बियाणे व पिके यांचा पुरस्कार करणे चालू केले आहे.याचे परिणाम फारच वाईट होतील आणि मुख्य म्हणजे ते कायमस्वरूपी पर्यावरणाचा नाश करतील. हे पाऊल उचलण्यापूर्वी सरकारने खरंच विचार करावा. शासनाने सुरक्षित पर्याय अन्नदात्या शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावा हीच जनतेची अपेक्षा आहे. आधीच शेतकरीवर्ग उत्पादनाचा वाढता खर्च, कर्जबाजारीपणा, कीटकनाशकांमुळे ढासळते आरोग्य अशा अनेक आपत्तींच्या खाली पिचला जात आहे.

## या काळोख्या परिस्थितीत देखिल.
## एक आशेचा किरण दिसत आहे.

जगभरात चाललेल्या प्रयोगात व संशोधनात असे आढळून आले की शेतीचे सुरक्षित पर्याय जास्त फायद्याचे ठरतात व एकंदर त्याचे परिणामही खूप चांगले दिसून येतात. उदाहरणार्थ, आंध्रप्रदेशात लाखो शेतकरी केमिकल कीटकनाशक विरहित शेती करू लागले आहेत. (NPM = Non Pesticidal Management) या तऱ्हेची शेती शेतकऱ्याला जास्त फायदा मिळवून देते असे सिद्ध झाले आहे. शिवाय यामुळे अन्नधान्यही कीटकनाशकांपासून मुक्त झाले आहे. पण भारतीय शासन या सुरक्षित पर्यायाला उत्तेजन न देता कीटकनाशक कंपन्यांचेच हित जोपासत आहे.

**म्हणूनच आपण ग्राहकांनी एकत्र येऊन सुरक्षित अन्नाची मागणी केली पाहिजे. तो आपला हक्क आहे.**
शासनाने आपणांस हे किटकनाशकयुक्त अन्न खावयास आतापर्यंत विवश केले होते, पण आता वेळ आली आहे सुरक्षित अन्न व पर्यावरण स्नेही शेती यांना योग्य संरक्षण देण्याची मागणी करण्याची.

**म्हणूनच आपली शासनाकडे मागणी आहे की;**

- सेंद्रीय / नैसर्गिक शेतीचा प्रचार व प्रसार करावा. तसेच शेती रासायनिक किटकनाशकांपासून व जी.एम्. पिकांपासून मुक्त ठेवावी.
- लहान मुले, गरोदर स्त्रिया, बाळंतिणी यांच्या सकट सर्वानाच विषमुक्त सेंद्रीय अन्न पुरवावे.
- अन्य देशांमध्ये ज्या किटकनाशकांवर बंदी आहे त्यांना आपल्या देशातही बंदी घालावी.

स्थानिक IFSF Team: डॉ. शैला वाघ : 9821418876,
सत्यजित चव्हाण :9820375011 tejal.roots@gmail.com

लॉगऑन करा. www.indiaforsafefood.in आणि याचिकेला पाठिंबा द्या. आम्ही तुमचे म्हणणे कृषिमंत्र्यांकडे पोचवू.
ह्या वेबसाइटवर तुम्हाला इतरही माहिती मिळेल ज्यायोगे तुम्ही यासाठी अधिक सहयोग देऊ शकाल आणि बदल घडवून आणू शकाल.
किंवा एक मिस्ड कॉल द्या ०२२-३३०१००३१ आणि आम्ही तुमचा संदेश पोचवू.